## प्रकरण पहिले

## मराठी प्रेमकविता : काही वळणे

# मराठी प्रेमकविता : काही वळणे

ललित साहित्यात काही ठराविक विषय वारंवार आढळून येतात. ललित साहित्याच्या सर्व प्रकारांत त्यांना स्थान लाभलेले दिसते. स्त्रीपुरुषसंबंध, देशप्रेम, अज्ञाताची ओढ, निसर्गाचे आकर्षण, मुलाबाळांविषयीचा कळवळा हे अशा प्रकारचे विषय होत. या विषयांचा माणसांशी घनिष्ठ संबंध असतो. ते त्यांच्या जिव्हाळ्याचे विषय असतात आणि म्हणूनच ते साहित्यनिर्मितीला प्रेरक ठरतात. यांतही स्त्रीपुरुषप्रीती हा माणसाच्या अत्यधिक जिव्हाळ्याचा विषय असल्यामुळे तिचे चित्रण ललित साहित्यात स्वाभाविकपणेच अधिक येते. प्रेम हे जगाचे आद्यतत्त्व व जीवनाचे सारसर्वस्व असल्याने संवेदनशील लेखकाला ते टाळता येणे शक्यच नाही. जगाचा प्रारंभच मुळी पुरुष-प्रकृतींपासून किंवा शिवशक्तींपासून झालेला आहे. त्यामुळे विश्व-साहित्यात प्रेमाभिव्यक्तीची असंख्य उदाहरणे आढळावीत यात कोणतेच नवल नाही.

स्त्रीपुरुषांतील परस्पर आकर्षण हे जगाचे एक चिरंतन सत्य आहे. सर्व मनोविकारांपेक्षा प्रेमवृत्ती ही बलवत्तर आणि शाश्वत स्वरूपी आहे. तिचा अनुभव आला नाही असा मनुष्य प्राय: दुर्मिळच. आणि साहित्य म्हणून ज्याला संबोधिले जाते ते तरी काय आहे ? साहित्य म्हणजे मानवी अनुभवांचा खजिना! तेच त्याचे ठळक वैशिष्टय. या साहित्याचे मोठे दालन प्रेमानुभवांनी व्यापलेले आढळते. कोणत्याही भाषेतील साहित्याची साक्ष काढा. त्यात प्रेमचित्रांचेच आधिक्य आढळेल. साहजिकच मराठी साहित्यातही प्रेमाभिव्यक्तीची अगणित

उदाहरणे आढळतात. मराठी साहित्याकडे वर वर नजर टाकली तरी सर्व युगांमध्ये स्त्रीपुरुषप्रीतीचे चित्रण आलेले दिसते. कधी ते ईश्वरी भक्तीच्या अवगुंठनातून व्यक्त झाले आहे, कधी राधाकृष्णप्रीतीच्या अप्रस्तुत स्वरूपात ते प्रकट झाले आहे, कधी आत्मलेखनाच्या उघडया रूपाने ते दर्शन देत राहिलेले आहे, तर कधी अंतर्मनाच्या गाठी उघडण्यात ते व्यस्त बनून राहिलेले आहे. प्रेमाची अशी अनेकविध रूपे आणि छटा मराठी साहित्याने व्यक्त केल्या आहेत.

एकूण मराठी साहित्याकडे पाहता त्याचा एक ठळक विशेष दिसून येतो. हे साहित्य क्रमाक्रमाने अलौकिकाकडून, परमार्थाकडून ऐहिकाकडे वळलेले दिसते. परमार्थाकडून ऐहिकाकडचा त्याचा हा प्रवास हे त्याचे ठळक असे वैशिष्टय आहे. हा प्रवासच मराठी साहित्याच्या विकासाला कारणीभूत झालेला आहे. प्रस्तुत प्रेमकवितेच्या दृष्टीने बोलावयाचे तर पारमार्थिक अवगुंठनातून आपली प्रेमाभिव्यक्ती करणारी मराठी कविता पुढे लौकिक प्रेमवृत्तीत नाचू लागते आणि त्यातही पुन्हा स्थूल, शारीरिक प्रीतीकडून सूक्ष्म, मानसिक प्रीतीकडे ती वाटचाल करते. प्रारंभी भक्तिरसात डुंबणारी ही मराठी कविता पुढे प्रीतिरसात डुंबू लागते आणि आपले वासनात्मक रूप प्रकट करता करता कधी मानसिक प्रेमात अवगाहन करू लागते. आपल्या या वाटचालीत मराठी प्रेमकवितेने अनेक वळणे घेतलेली दिसतात. त्या वळणाचा संक्षेपाने आढावा घेणे मला माझ्या वर्ण्य विषयाच्या दृष्टीने आवश्यक वाटते.

## संतांची मधुराभक्ती

मराठी कवितेत प्रथम प्रेमाभिव्यक्ती झाली ती मधुराभक्तीच्या रूपाने. प्राचीन मराठी संतांची कविता ही उत्कट भक्तीने भारावलेली कविता आहे. कृष्ण हे त्यांचे प्रधान दैवत. कृष्णाच्या विठ्ठल रूपावर त्यांनी आपले सर्वस्व वाहिलेले. या भक्तिप्रवण संतांनी अध्यात्म आणि वैराग्य यांना अतिशय महत्व दिले. जीवन हे भक्तीचे साधन आहे हीच त्यांची दृष्टी होती. त्यांच्या जीवनात शारीरिक आनंदाला अत्यंत गौण स्थान. मोक्ष हाच त्यांचा परमानंद. त्यामुळे ऐहिक सुखाची त्यांनी फारशी पर्वा केली नाही. संयम हाच त्यांचा आचारधर्म होता. तथापि या संतांनाही प्रेमाभिव्यक्ती सर्वस्वी डावलता आली नाही. ईश्वर आणि भक्त यांचे मनोमीलन स्पष्ट करताना, रासक्रीडेचे वर्णन करताना, बाळक्रीडा - गौळणी - विरहिणी यांची चित्रे रेखाटताना आणि काही प्रतीकांनी आपला आशय उलगडताना या संतांना नैसर्गिक प्रेमभावनेचा आधार घ्यावाच लागला आहे.

परमेश्वर हा पती आणि भक्त पत्नी किंवा परमेश्वर हा प्रियकर आणि भक्त प्रेयसी असे नाते जोडून जी भक्ती केली जाते तिला वैष्णव शास्त्रकारांनी " मधुराभक्ती " असे नाव दिले आहे. मराठी संतांच्या कवितेत तिची अनेक उदाहरणे आढळतात. भक्त आणि ईश्वर यांच्या मीलनाची चित्रे रेखाटताना मराठी संतांना स्त्रीपुरूषमीलनाचीच आठवण झालेली आहे. वेदकालीन ऋषींनादेखील भक्त आणि परमेश्वर यांच्या आंतरिक एकरूपतेचे वर्णन करताना पतिपत्नींच्या मीलनाचेच स्मरण झालेले होते. पतिपत्नींचे मीलन हे अद्वैतरूपी असते, त्यात

सामरस्य असते आणि म्हणूनच भक्ताचे परमेश्वरावरील आत्यंतिक प्रेम व्यक्त करताना मराठी संतांनाही या संबंधाचेच सूत्र पकडावे लागलेले आहे. ते स्वत:स पत्नी आणि परमेश्वरास आपला पती मानून आपले सर्वस्व त्याच्या पायांवर वाहतात. एवढेच नव्हे, तर त्यांचा परमेश्वरच आपल्या भक्ताला वल्लभा मानून स्वत:कडे तिच्या कांताची भूमिका घेतो. श्रीकृष्ण आपल्या भक्ताचे मोठेपण कौतुकाने सांगताना म्हणतात,

" अर्जुना, तो भक्त। तोचि योगी तोचि मुक्त।
तो वल्लभा मी कांत। ऐसा पढिये ॥"[१]

परमेश्वर आणि भक्त यांच्या मीलनावस्थेचे वर्णन करताना मराठी संत मधुराभक्तीचा आश्रय घेतात, त्याचप्रमाणे गोपींची मनोवस्था सांगतानाही ते तिचा आधार स्वीकारतात. भक्तीत प्रेमवृत्तीला केवढे स्थान आहे हेच संतांच्या गोपी स्पष्ट करून जातात. नारदस्मृतीमध्ये व्रजगोपिकांच्या नि:सीम प्रेमाला खरी भक्ती मानलेले आहे. त्यामुळे प्रेममार्गाने आदर्श भक्ती करणाऱ्या गोपींबद्दल मराठी संतांना अतीव आदर आहे. मुळात श्रीकृष्ण हे या संतांचे आराध्य असल्यामुळे कृष्णाच्या संबंधित्वाने त्यांच्या कवितेत राधा आणि गोपी येतात, त्यांची रासक्रीडा येते आणि गौळणी व विरहिणी यांची चित्रे येतात. संत कवींनी राधाकृष्ण आणि गोपीकृष्ण यांच्या प्रेमसंबंधाकडे उत्कट भक्तीचे एक प्रतीक या दृष्टीनेच पाहिलेले आहे. पुन्हा हे सर्वदा वस्तुनिष्ठ

---

१. ज्ञानेश्वरी, बारावा अध्याय, ओवी १५६.

वर्णन असते असे नाही. हे संत स्वत:कडे राधेची किंवा गौळणीची भूमिका घेऊन कृष्णाची आराधना करतात. प्रेमवृत्तीच्या माध्यमातून परमेश्वराशी नाते जोडताना मराठी संतांनी मोठया विविधतेने आपल्या अनुभूतीचा आविष्कार केलेला आहे. एक विरहिणीच घेतली तर तिच्या मनोभावांची केवढी दखल या संतांनी घेतली आहे! श्रीकृष्णरूपाचा तिचा निदिध्यास, त्याच्या चिंतनात तिला स्वत:चे झालेले विस्मरण, त्याच्या भेटीसाठी तिची आतुरता, तिच्या मनाची तगमग आणि हुरहूर, त्याच्या मुरलीरवाने तिच्या मनाला लावलेले वेड, कृष्णाच्या विरहाने तिच्या शरीराचा झालेला दाह, तिच्यावर केल्या जाणा-या शीतलोपचारांबद्दल तिची नाराजी, शुभशकुनांनी तिची झालेली सोत्कंठ स्थिती आणि शेवटी मीलनाचा आनंद - विरहिणीच्या या सा-या अवस्था मराठी संतांच्या कवितेत आढळतात.

मराठी संतांनी भक्तीची भावना आणि कृष्णकथा यांना शृंगाराचे जे आवरण चढविले आहे त्याला आणखी एक कारण झालेले आहे. सर्वसामान्य माणसाचे शृंगारावर प्रेम असते. तेव्हा त्या मार्गाने का होईना या लोकांचे लक्ष कृष्णभक्तीकडे वेधावे या हेतूनेही त्यांनी आपल्या कवितेत अधूनमधून शृंगाराचा शिडकावा केलेला आहे. शिवकल्याण हे एक कृष्णभक्त. श्रीकृष्ण चरित्राचे आध्यात्मिक रहस्य त्यांनी अतिशय खुलवून सांगितले आहे. आपल्या रासपंचाध्यायीत शृंगाराचा भक्तीशी कसा संबंध पोहोचतो हे सांगताना ते लिहितात,

" जे शृंगाररसी आसक्त। त्यांसि हाचि रस प्रस्तुत।

सेव्य असून त्यांचे चित्त। स्वनिष्ठ करावें।।[१] "

मराठी संतांच्या या मधुराभक्तीबद्दल डॉ. प्र. न. जोशी लिहितात, " महाराष्ट्रातील मधुराभक्ती भागवत संप्रदायाच्याच आधाराने विकसित होत गेल्यामुळे तिला गौरवपूर्ण अशी मर्यादा प्राप्त झाली. बहुतेक संतांनी विठोबास माउली म्हणून आळविले आहे. या माउलीशी " शृंगारी " भाव कल्पिताना संतांनी कमालीचे गांभीर्य व मर्यादा राखली आहे. ज्ञानदेव, तुकाराम व निळोबा यांच्या विराण्या या दृष्टीने पाहण्यासारख्या आहेत. भाषेत सर्वत्र शृंगारी थाट, पण अभंगांतील अनुभूती मात्र वैराग्याची वा ज्ञानाची दिसून येते. भक्ती व ज्ञान यांचे इतके सुंदर मिश्रण इतरत्र मिळणार नाही.[२] "

## पंडित कवींची प्रेमाभिव्यक्ती

संतकवी आणि पंडितकवी यांत वर्ण्यविषयाच्या दृष्टीने साम्य आहे. राम-कृष्णांच्या कथांच्या आधारेच त्यांनी काव्यनिर्मिती केलेली आहे. "आपण काही तरावया गावे " हा त्यांच्या काव्य-रचनेचा हेतू पंडित कवींनी स्वतःच सांगितला आहे. परंतु राम - कृष्णांच्या, विशेषतः कृष्णाच्या कथा सांगताना त्यांनी स्त्रीपुरुषसंबंधाच्या बाबतीत आपले वेगळेपण व्यक्त केले आहे. संतकवी आणि पंडितकवी

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१. शिवकल्याण, रासपंचाध्यायी, ९३१.

२. डॉ. जोशी, प्र. न. 'मराठी साहित्यातील मधुराभक्ती ' प्रथमावृत्ती, १९५७, व्हीनस प्रकाशन, पुणे, पृष्ठ ३८२.

यांची वृत्तीच काहीशी वेगळी आहे. संत हे प्रपंचविमुख होते आणि विरक्त जीवनाचा त्यांना ध्यास होता. पंडितकवी असे विरक्त वृत्तीचे नव्हते. प्रापंचिक सुखाचा त्यांना अनुभव होता आणि ओढही होती. आणि दुसरे म्हणजे त्यांची काव्याभिरुची संस्कृत विदग्धकाव्ये आणि नाटके यांवर पोसलेली होती. त्यांच्यापुढे असलेला समाज देखील प्रपंचात रस घेणारा होता त्यामुळे स्त्रीपुरुषसंबंधाचा त्यांचा आविष्कार संतकवींहून काही वेगळाच झालेला आहे.

वामन पंडितांनी भागवताच्या आधारे मराठीत अनेक आख्याने लिहिली आहेत. तेच पंडित कवींचे प्रातिनिधिक कवी आहेत. वामन-पंडितांनी श्रीकृष्णचरित्रातील शृंगाराचे निःसंकोचपणे वर्णन केलेले आहे. यादृष्टीने त्यांची राधाविलास, राधाभुजंग, द्वारकाविजय ही आख्यानेच काय त्यांच्या बालक्रीडाही उल्लेखनीय आहेत. या काव्यांतील उत्तान शृंगार पाहूनच बा.अ. भिडे यांनी शृंगारप्रिय वामन आणि वेदांतप्रवण वामन असे दोन वामन कल्पिले आहेत. तथापि शृंगारिक रचनेतही वामन पंडितांची भक्तिप्रवणता व पांडित्य दिसत असल्याने असे दोन वामन मानावयास अन्य विद्वान तयार नाहीत. वामनपंडितांच्या आख्यानांत नको इतके शृंगार वर्णन आले आहे याबद्दल मात्र सर्व विद्वानांचे एकमत आहे. शृंगाराबरोबर या काव्यात जी भक्तिप्रवणता व पांडित्य आढळते त्याबद्दल प्रा. रा. श्री. जोग लिहितात, " शृंगाराच्या डोहाकडे सारखे ढकलीत तर न्यावयाचे, आणि मधून मधून मानगूट पकडून वाचकाला मागे खेचावयाचे, असा हा प्रकार.[१] " होय. पंडित कवींतही अतिशय

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१. जोग रा.श्री., 'मराठी वाङ्मयाभिरुचीचे विहंगमावलोकन,' प्रथमावृत्ती १९५९, पुणे विद्यापीठ प्रकाशन, पृष्ठ १२७.

उत्तान शृंगार विठ्ठलामध्ये आढळतो. त्याच्या " रसमंजिरी " आणि " चौरपंचाशिका " या भाषांतरित काव्यात हा शृंगार पराकोटीला गेलेला दिसतो. त्याच्या एकूण श्रीकृष्णचरित्रातही शृंगाराची नदी वाहताना आढळते. अन्य पंडित कवींतही कमी-जास्त प्रमाणात उत्तान शृंगाराची उदाहरणे आलेली आहेत.

पूर्वी सांगितल्याप्रमाणे हे पंडितकवी संसारात रमलेले आहेत. त्यांची अभिरुची प्राय: शृंगाराला अनुकूल अशीच आहे आणि त्यामुळेच संस्कृत साहित्यातील शृंगारपर भागाची त्यांनी निवड केलेली दिसते. या कवींच्या पुढे जो समाज होता तोही शृंगाराला चटावलेला असाच होता. या सर्व कारणांनी पंडिती काव्यात शृंगारपर चित्रे ब-याच प्रमाणात आलेली आहेत. संतकवींचे आणि पंडितकवींचे प्रधान दैवत कृष्णच, पण कृष्णचरित्राच्या माध्यमातून दोघांनी केलेली प्रेमाभिव्यक्ती मात्र वेगवेगळी झाली. संतकवींच्या काव्यात कामुकतेचा किंवा वैषयिकतेचा संबंध कार्यकारणरूपाने मुळीच येत नाही. याउलट पंडिती काव्यात शृंगाराला कामुकतेचे रूप आलेले आहे. पंडिती काव्यात राधा-कृष्णांच्या प्रेमलीलांच्या निमित्ताने मुक्त आणि क्वचित् अश्लील चित्रे येतात ती यामुळेच. पंडित कवींच्या प्रेमाभिव्यक्तीचे रूप असे लौकिकाकडे झुकलेले आहे.

## शाहिरांचे शारीरप्रेम

मराठी कवितेचा प्रवास अलौकिकाकडून लौकिकाकडे असा चालू होता. शाहिरी कवितेत ती ऐहिकतेच्या पातळीवरच उतरलेली

दिसते. त्यादृष्टीनेच शाहिरी कवितेला " अस्सल गाणे अस्सल नाणे " असे म्हटलेले आहे. या कवितेची ही ऐहिकता लक्षात घेऊनच विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी या कवितेला " मराठी भाषेची आद्यकविता " म्हटलेले आहे.[१] अ.ब.कोल्हटकर या कवितेला " मराठी काव्याची प्रभात " मानतात. ते लिहितात, " हे कवी संस्कृत संस्कृतीच्या पदराखालीही झाकले गेलेले नव्हते. आंग्ल संस्कृतीच्या कडेवरचे बाहुले नव्हते व जे काय होते ते त्यांच्या स्वतःचे होते. खरी मराठी कविता ती ही होती[२]" प्रा. दाण्डेकरांनी असेच मत व्यक्त केलेले आहे. शाहिरी कविता म्हणजे महाराष्ट्रीय जीवनाचे खरेखुरे प्रतिबिंब होय असे या मंडळींनी आवर्जून सांगितलेले आहे.

प्रेमाभिव्यक्तीच्या दृष्टीने विचार करावयाचा तर शाहिरी कविता लौकिक प्रीतीच्या आहारी गेलेली दिसते. शारीर प्रेमाच्या अभिव्यक्तीचा तिला मोठा छंद आहे. शाहिरांनी अनेक लावण्यांत स्त्रीचे वर्णन केलेले आहे. लावणीतील ही स्त्री " वय बारा-तेरात ऐनभरात"येते. तिची " सुरत छबिदार फाकडी " असते. तिचे "जोबन शाहिरे आणि काचोळी तंग " असते. प्राय: ती " डुब दागिन्यात खुप " सजलेली असते. अशा नायिकेकडे पाहून नायकाला विद्युन्लटी चमकल्याचा भास होतो. ती " कधी हाती चढेल " अशी त्याला ओढ लागते. आणि तो तिला " अम्हाला दे सोबत एक रात्री "

---

१. चिपळूणकर विष्णुशास्त्री, 'संस्कृत कविपंचक'.

२. कोल्हटकर अ.ब., स्मारक ग्रंथ, मुंबई १९१४, पृष्ठ १४.

अशी मागणी घालू लागतो. या मागणीला प्रतिसादही तसाच अनुकूल मिळतो. नायिका " घ्या मांडीवर मला हो कवळून " असे म्हणू लागते. आणि ती त्याची इच्छा पुरविते. " मैत्र म्या सुरेख केला नवा " अशी तिची भावना बनते.

मराठी शाहिरांची बहुसंख्य कविता अशा कामुक शृंगाराने भरलेली आहे. ती " इष्काचे आगर " आहे. " विषयसागराला पुष्कळ पाणी चढलेले " येथे दिसते. " एक सख्याविण सारे सुने " असा इथला अनुभव असतो. " कशी हातास चढशील नारी " ही नायकाची इच्छा तर " लाधेल हे रत्न कसे साजणी " अशी नायिकेची हुरहूर. येथे ऊत येतो तो प्रेमदुधाला. नायिकेने भुवयकमाना ओढून मारलेल्या जंजिरी नेत्रबाणांनी नायकाचा देह बाणविध्द भीष्मांप्रमाणे " निचेत" पडतो. येथील नायक कर्णाची धर्मवासना अंगीकारून याचक बनून आलेल्या नायिकेला प्रेमदान देतो. शाहिरांची स्त्रीपुरुषांच्या मीलनाची ही कल्पना कामुकतेने पुरेपूर भरलेली आहे. त्यामुळेच या कवितेवर बरीच प्रतिकूल टीका झालेली आहे आणि शिष्ट समाजाने तिला नाके मुरडलेली आहेत. प्रा.रा.श्री.जोग[१], धों. वि.देशपांडे,[२] डॉ.रा.शं.वाळिंबे[3] यांसारखे टीकाकार या कवितेला " -हासकालीन कविता", " बाजारी कविता " समजतात.

---

१. प्रा.जोग रा.श्री., 'मराठी वाङ्मयाभिरुचीचे विहंगमावलोकन,' प्रथमावृत्ती १९५९, पुणे विद्यापीठ प्रकाशन, पृष्ठ 9

२. देशपांडे धों. वि., 'लावणी वाङ्मय काही विचार,' सत्यकथा, डिसेंबर १९५२, पृष्ठ १३.

३. डॉ.वाळिंबे रा.शं., 'साहित्यातील अश्लील आणि ग्राम्य.' पहिली आवृत्ती १९७०, सुविचार प्रकाशन मंडळ, पृष्ठ १४५.

शाहिरी कवितेला काहींनी " मराठीची आद्यकविता ", " मराठी काव्याची प्रभात " म्हटलेले आहे, तर दुसरीकडून ती " -हासकालीन कविता " आहे असे सांगितले गेले आहे. या शाहिरी कवितेचे कौतुक करताना प्रा.म.वा.धोंड लिहितात, " स्त्रीपुरुषसंबंधातील विविध छटा मराठी लावण्यात जशा रंगविल्या आहेत तशा दुस-या कोणत्या भाषेतील काव्यात रंगविल्या असतील असे वाटत नाही." प्रा.धोंड यांच्या या विधानातील " विविधछटा " या शब्दापूर्वी " कामोद्रेकपर " हा शब्द जोडला तरच शाहिरी कवितेचे वास्तव वर्णन होईल. या कवितेत क्वचित एकनिष्ठ प्रीतीचे रम्यचित्र आले, तरी शाहिरी कविता ही बहुधा कामुकतेने पछाडलेली आहे. प्रेमाभिव्यक्तीतील कामुक वळण दर्शविणारी ही कविता आहे.

केशवसुत संप्रदाय

केशवसुतपूर्वकालीन मराठी कविता ही परप्रत्ययी असल्याने तिला सार्थपणे भाषांतरयुगीन कविता म्हटले जाते. या काळात मराठी कवितेत पूर्वीच्याच काही परंपरांनुसार काव्यलेखन चालू होते. आणि वि.मो.महाजनी आदी काही कवींनी इंग्रजी कवितेचे रूप मराठी रसिकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केला, तरी ते भाषांतरात्मक असल्यामुळे या प्रेमाभिव्यक्तीचा मराठी साहित्यावर फारसा परिणाम झालेला नाही. प्रेमाभिव्यक्तीच्या दृष्टीने भाषांतर युगातील कवितेला जमेची बाजू फारशी नाही.

मराठी प्रेमकवितेच्या क्षेत्रात प्रथम मोठे स्थित्यंतर घडविले ते केशवसुतांनीच. इंग्रजीतील " लव्ह लिरिक"च्या अनुकरणाने व

अनुसरणाने केशवसुतांनी प्रेमगीताचा प्रकार मराठीत आणला. तो मोठा अनोखा व नवखा होता. वा.ब.पटवर्धनांनी या प्रकाराला " आशकाचे वेड " असे अन्वर्थक नाव दिले आहे. केशवसुतांच्या पूर्वीच्या आणि त्यांच्या समकालीन कवींना आत्मलेखनात्मक स्वरूपाची प्रेमगीते लिहिण्यामध्ये एक प्रकारचा ओशाळगतपणा वाटत होता. केशवसुतांनी प्रेमकवितेच्या बाबतीत सर्वात मोठी कामगिरी कोणती केली असेल, तर ही ओशाळगतपणाची भावना त्यांनी काव्यक्षेत्रांतून हद्दपार केली ही होय. कवीने आपल्या स्वत:च्या प्रेमभावना स्वत:च्या म्हणून व्यक्त करण्यास सुरुवात झाली ती केशवसुतांपासूनच.

केशवसुतांच्या प्रेम या विषयाशी प्रत्यक्षाप्रत्यक्ष संबंध असलेल्या सुमारे चाळीस कविता आहेत. त्यांच्या या प्रेमकवितेत एक विकास दिसतो. संस्कृत वाङ्‌मयाच्या वाचनाच्या परिणामामुळे प्रारंभीच्या त्यांच्या काही प्रेमकवितांत शारीरिकता आढळली, तरी उत्तरोत्तर ती अशारीर प्रेमाकडे झुकत गेलेली दिसते आणि तीमधील भावनेचा आविष्कार अधिक उच्च पातळीवरून झालेला आढळतो. त्यांच्या प्रेमकवितांत काही अनुवादात्मक, काही प्रेमविषयक, काही काव्यदेवतेला उद्देशून लिहिलेल्या, काही पौराणिक प्रेमकथा सांगणाऱ्या, काही वैयक्तिक प्रेमविषयक आणि काही प्रेमविषयक तत्वज्ञान सांगणाऱ्या आहेत.

केशवसुतांच्या काही कविता आपल्या पत्नीला अनुलक्षून लिहिलेल्या आहेत. यांपैकी " प्रयाणगीत ", " प्रत ", " फार दिवसांनी भेट ", " प्रणय- कथन " इत्यादी कवितांत उत्कट भावनेचे विलक्षण सामर्थ्य प्रकट झाले आहे. केशवसुतांची पत्नीविषयक गीते

खरोखरच हृदयात गोड खळबळ उत्पन्न करणारी आहेत. एकदा पत्नीचा निरोप घेताना ते म्हणतात,

" तुजविण मजला काहि असेना प्रिय या गे जगती
तू मम जीवित! तू मम आत्मा!! तू माझी शक्ती!!![1] "

दुसऱ्या एका ठिकाणी ते पत्नीला आपले कुशल कळवताना लिहितात,

" लोचनाला या होसि तू प्रकाश
मदीयात्म्याचा तूच गे विकास,
नाडि माझी तव करी वाहताहे,
हृदय माझे तव उरी हालताहे।
करा अपुल्या तू पहा चाचपून
उरा आपुलिया पहा तपासून
प्रकृति माझीही तुज तिथे कळेल,
विकृती माझी, तुज तिथे आढळेल।[2] "

केशवसुतांची ही प्रेमाभिव्यक्ती त्यांची प्रेमासंबंधीची नवी दृष्टी स्पष्ट करणारी आहे. त्यांनी मराठी कवितेत नवीन वळण आणले याचा अर्थ काव्यविषयक नवीन दृष्टीच स्वीकारली असा आहे. केशवसुतांची प्रेमविषयक दृष्टी पूर्वसूरींहून अगदीच भिन्न आहे. वस्तुत: केशवसुतांच्या पुढे संस्कृत आणि लावणी वाङ्मयाचा दाखला होता आणि तरीही त्यांचे प्रेमकाव्य उत्तान शृंगारात्मक किंवा अश्लील झाले नाही. निर्मळ, मुग्ध प्रीतीचा आविष्कार असे त्यांच्या प्रेमकवितेचे रूप आहे.

---

१. जोग रा. श्री., संपादक 'हरपले श्रेय,' द्वितीयावृत्ती १९६४, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृष्ठ ५०.
२. खांडेकर वि. स. संपादक "केशवसुत काव्य आणि कला", प्रथमआवृत्ती, १९५६, देशमुख आणि कंपनी, पुणे, पृष्ठ १३०.

केशवसुतांनी आपल्या काही कवितांत आपले प्रेमाचे तत्वज्ञान किंवा प्रेमविषयक आपला दृष्टीकोनही व्यक्त केला आहे. " प्रीती ", " समृध्दी आणि प्रीती ", " कर्तव्य आणि प्रीती ", " मयूरासन आणि ताजमहाल ", " प्रीतीची भाषा " यांसारख्या कवितांतून त्यांचे प्रेमविषयक तत्वज्ञान व्यक्त झाले आहे. प्रेम हे बाजारात किंवा शेजारीपाजारी मिळणारी क्षुद्र वस्तू नव्हे, खरी प्रीती त्यागात आणि कर्तव्यपूर्तीत व्यक्त होते असे केशवसुतांचे सांगणे आहे. " मयूरासन आणि ताजमहाल " या कवितेत ते सांगतात,

" मत्त भ्रांत नरा। सदैव कितिही तू धूप रे जाळिला
स्वार्थाच्या प्रकृतीपुढे, निजमनी ही याद तू जागती
राहू दे - तरि धूर होइल जगी केव्हाच तो लोपला।
काडी एकच गन्धयुक्त, नमुनी प्रीतीस तू लाव ती,
तीचा वास सदा जगी पसरुनी देईल तो तुष्टिला।[१] "

केशवसुतांनी मराठी प्रेमकवितेला अशी वेगळी दृष्टी आणि भक्कम अधिष्ठान प्राप्त करुन दिले यात संशय नाही. प्रणयाची विविध दर्शने त्यांच्या प्रेमकवितेत दिसून येत नसतील, तिच्यात बुध्दिनिष्ठ कल्पकतेचा अधिक विलास आहे, हेही जाणवेल. तथापि या मर्यादांतही मराठी प्रेमकवितेत केशवसुतांनी जी भर घातली आहे ती अपूर्वच म्हणावी लागेल. प्र. रा. श्री. जोग लिहितात,

---

१. जोग रा.श्री., संपादक, " हरपले श्रेय ", द्वितीयावृत्ती १९६४, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृष्ठ .६२.

" केशवसुतांनी कदाचित् उत्तमोत्तम प्रेमगीते लिहिली नसतील, पण स्वत:च्या प्रेमाच्या भावनांचा आविष्कार उघडपणे व सरळपणे करण्याचा मार्ग घालून दिला यात शंका नाही.[१] " आधुनिक मराठी प्रेमकाव्य उत्तान शृंगारात्मक किंवा अश्लील बनले नाही यालाही केशवसुतच कारणीभूत आहेत.

प्रेमाभिव्यक्तीच्या बाबतीत केशवसुतांनी निर्माण केलेल्या चाकोरीतूनच पुढील कवींनी मार्गक्रमण केलेले आढळते. " मराठी प्रेमकविता" कार लिहितात, " केशवसुतांनी प्रवर्तित केलेल्या प्रेमविषयक संकल्पनांच्या अनुषंगानेच मराठी प्रेमकवितेने पुढे आपला मार्ग चोखाळलेला दिसतो. प्रेमभावनेच्या प्रांजळ, नितळ आणि सुंदर आविष्काराचा हा मार्ग केशवसुतांनी समकालीन आणि नंतरच्या कवींना मोकळा करून दिला. त्या वाटेने जाताना वेगवेगळया कवींनी आपली स्वतंत्र भर -- मराठी प्रेमकवितेत टाकली. कित्येकांनी आपले वेगळे व स्वतंत्र परिमाण तिला दिले.[२] " रे. टिळक यांची प्रेमकल्पना सोज्ज्वळ व उदात्त आहे. " रूप न लगे तव, हवी तुझी प्रीती " असे ते म्हणतात, तर बालकवी " प्रेमावाचुन फेड कशाने प्रेमाची व्हावी ?" असा प्रश्न करतात. केशवसुतांचा मार्ग चोखाळून गोविन्दाग्रजांनी " प्रेमाचे शाहीर" हे बिरूद प्राप्त केले आणि रेंदाळकरांनी विपुल प्रेमकविता लिहून प्रेमासंबंधीची आपली एक

---

१. जोग रा.श्री., 'केशवसुत,' प्रथमावृत्ती १९४७, केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, पृष्ठ १६६.

२. शेळके शान्ता आणि ढेरे अरूणा, संपादिका 'मराठी प्रेमकविता,' सुरेश एजन्सी, पुणे, पृष्ठ पंधरा.

वेगळीकही प्रकट केली. "बाह्योपाधीत प्रीती नसते ", " प्रीती ही केवळ प्रीतीकरिताच असते " असे विचार रेंदाळकरांनी प्रगट केले आहेत तथापि त्यांनी मांडलेली " प्लेटॉनिक लव्ह " ची कल्पना मोठी विलक्षणच म्हणावी लागते. मित्र, भगिनी व पत्नी यांच्यातील प्रीतीभावनेत ते भिन्नता मानीत नाहीत आणि या सर्व नात्यांत चुंबनालिंगनांचे व्यवहार मान्य करतात.

रविकिरणमंडळाचा प्रेमाविष्कार

रविकिरणपूर्वकालात तीन मोठे कवी काव्यरचना करताना दिसतात. तांबे, चंद्रशेखर आणि बी हे ते तीन कवी होत. या तीन कवींपैकी भा. रा. तांबे यांच्या प्रेमकवितेत फार मोठी विविधता दिसते. प्रेमछटांची जबर समृध्दी हा तांब्यांच्या प्रेमकवितांचा मोठा विशेष होय. चंद्रशेखर प्रेमाविष्काराच्या बाबतीत आत्मलेखनाच्या अगदी विरुध्द आहेत. बी कवींनी मात्र प्रेमाची मनोज्ञ चित्रे रेखाटली आहेत. दिव्य, विशुध्द आणि उत्कट प्रेमाचे सत्यस्वरूप बी कवींनी आपल्या " चाफा " या गीतात उघड केले आहे. या कवितेचे स्पष्टीकरण देताना कवी सांगतात, " निसर्गसिध्द शुध्द प्रेमभावनेचे निघालेले निःशंक आतुर उद्गार " चाफा " या कवितेत आले आहेत. प्रेमीभूत ध्येयविषयाची गाठ पडली असता आणि प्राप्ती झाली असता सर्वंध देहस्वभाव पालटून निखळ प्रेम हाच एक सहज स्वभाव बनून जातो.[१] "

---

१. अत्रे प्र. के., संपादक 'फुलांची ओंजळ', 'चाफा', प्रथमावृत्ती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पृष्ठ ८७.

वींनी एकनिष्ठ दिव्यप्रेम हे जन्मांतरीही नष्ट होत नाही हा भाव " बकुळ " या कवितेत व्यक्त केला आहे. केशवसुतांनी प्रेमवृत्तीची जी विशुध्द दिशा दाखविली होती त्या दिशेनेच या कवींनी प्रेमाविष्कार केलेला दिसतो.

रविकिरण मंडळातील कवी प्राय: केशवसुतांच्याच मार्गाने गेले आहेत. तथापि त्यांच्या प्रेमाविष्काराची काही वेगळीकही आहे. प्रेमकल्पना आणि तिचा आविष्कार या दोहोंतही रवि-किरण मंडळाने स्वतंत्रता घेतलेली दिसते. मंडळाच्या कवींनी निर्भय व निरपेक्ष प्रेमाचा मुक्त मनाने व मुक्त कंठाने पुरस्कार केलेला आढळतो. प्रीतीच्या विविध रूपांचा, नाजूक छटांचा अपूर्व आविष्कार त्यांच्या कवितेत दिसून येतो. या कवींच्या प्रेमकाव्यात स्त्रीकडे वेगळया दृष्टीने पाहिले गेलेले आहे. स्त्री ही सहचरी, सखी, सहधर्मिणी आहे या दृष्टिकोनातून स्त्रीकडे पाहिल्यामुळे रविकिरणमंडळाच्या प्रेमाविष्कारात स्वाभाविकपणेच वेगळीक आलेली आहे. माधवरावांनी प्रेमविषयात आणि त्याच्या आविष्कारात जे नवीन्य आणले आहे त्याला तर मराठी काव्यात तोड नाही. प्रेमाच्या रूढ संकेतांविरुध्द बंड पुकारण्याची भाषा त्यांच्या कवितेत आढळते. " तेथे चल राणी " या कवितेत ते आपल्या राणीला म्हणतात,

" सामाजिक सम्बन्ध सखे, हे न टिकाऊ,
 हे स्नेह दिखाऊ।
मी तुज, मला तू, प्रभू दोघांस निदानी
 व्हा बध्द जिथे, प्रेम करा वा न कराही,
 नाते दृढ राही;
गे लग्नविधी जेथ न जीवैक्य - निशाणी

नाते पुरुषस्त्रीमधि ते अकच वाटे
  असे अुफराटे
ज्यांचे मत त्यांचे वच यावे नच कानी."[1]

प्रेम म्हणजे त्याग, प्रेम म्हणजे निष्ठा, प्रेम म्हणजे नि:स्वार्थ वृत्तीची पराकोटी हा विचार माधवजूलियन् यांनी मोठ्या उत्कटतेने व परिणामकारकपणे प्रकट केलेला आहे.

माधवराव उर्दू भाषेचे प्राध्यापक होते. उर्दूशी घनिष्ठ परिचय असल्याने इराणी घाटाचे अनेक कुंभ त्यांनी मराठी कवितेत आणलेले आहेत. उर्दूतून त्यांनी प्रेमाविष्कारपर नवे " गझल " हे वृत्त मराठीत आणले. माधवरावांच्यामुळेच उर्दूतल्या प्रेमरीतीचा मराठी कवितेत शिरकाव झाला. रविकिरणमंडळाच्या काव्यातील प्रेमभावना अनेकदा सामाजिक सुधारणावादाशी निगडित होऊन येते. 'विरहतरंगां'ची नायिका इंदू आणि गिरीशांच्या " अभागी कमल " मधील कमल या विधवा आहेत. त्यांच्या अनुषंगाने प्रेमभावाविष्काराबरोबरच विधवांचा सामाजिक प्रश्नही आपणांसमोर येतो.

कुसुमाग्रज आणि बोरकर यांच्या प्रेमकवितेत व्यक्तिपरत्वे पृथगात्मता आढळत असली, तरी त्यांची प्रेमकविता ही पूर्वकवींचा मागोवा घेतच व्यक्त झालेली दिसते. " मराठी प्रेमकविताकार " सांगतात, " परंपरेतून चालत आलेल्या प्रेमाविष्काराचे समृध्द संदर्भ

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१. माधव जूलियन्, 'स्वप्न-लहरी,' दुसरी आवृत्ती १९६६, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृष्ठ २०.

जेवढे बोरकरी प्रेमकविता मिरविते तेवढे दुसरी कोणतीच कविता नाही.[१]" देहमीलनाची धुंदी बोरकरांनी अगदी मुक्तपणे आणि सूक्ष्मपणे प्रकट केली असली तरी, " भुले जो केवळ देहसुखा, स्पर्शी का तो शकेल उजळू हृदयातिल अलका ?" असा प्रश्नही मांडला आहे. कुसुमाग्रजांच्या प्रेमकल्पनेत एक भव्यता आणि कर्तव्यपूर्तीची आकांक्षा आढळते. 'पृथ्वीचे प्रेमगीत' या कवितेत त्यांनी प्रेमाची भव्य दिव्य कल्पना मांडलेली आहे.

नवकवींची प्रेमवृत्ती

दुसऱ्या महायुध्दानंतर स्त्रीपुरुषसंबंधाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात बराच फरक पडला. प्रेम हे चिरकालीन सत्य असल्यामुळे प्रेमवृत्तीत पूर्णत: बदल जरी झाला नाही, तरी बदलत्या मूल्याबरोबर तिच्यातही काही अंतर येत गेले. यंत्रयुगामुळे आणि दुसऱ्या महायुध्दामुळे मानवी मूल्येच विस्कटून गेली. माणसाची किंमतच कमी झाली. ज्या मानवी हृदयाच्या आधाराने प्रेम उभे राहणार ते हृदयच अस्थिर आणि अशांत झाले युध्दोत्तरकालात जीवनाचा प्रखर संघर्ष चालू झाला आणि मानवी भावनांना तिरकसपणा येत गेला. मर्ढेकरांच्या कवितेत या तत्कालीन भीषण वास्तवाचे सुरेख प्रतिबिंब उमटले आहे.

---

१. शेळके शान्ता आणि ढेरे अरुणा, संपादिका, मराठी प्रेमकविता सुरेश एजन्सी, पुणे, पृष्ठ २१.

प्रेमाचे मूल्य प्रत्येकालाच समजत असते, परन्तु परिस्थितीने या प्रेमाला येणारे दुबळेपणही त्याला जाणवत असते. मर्ढेकर प्रेमाचे माहात्म्य चांगल्या प्रकारे जाणतात. भीषण परिस्थितीमुळे या प्रेमाला हातपाय पसरता येत नाही हेच त्यांचे दुःख होते. आसपास मुड्यांची रास पाहिल्यावर प्रेमाला कोमेजण्याशिवाय अन्य मार्गच राहत नाही. मर्ढेकरांनी त्यामुळेच यांत्रिक, निर्जीव संभोगाची चित्रे उभी केली आहेत. कृत्रिम शृंगाराची अशी विदारक चित्रे यापूर्वीच्या मराठी कवितेत आलेली नाहीत. ती प्रथमच मर्ढेकरांच्या कवितेत आढळतात. आजचा स्त्रीपुरुषसंबंध हा मर्ढेकरांना माणुसकीचे मोठे विडंबन वाटतो. मर्ढेकरांच्या कवितेत प्रेमाचे असे उग्रकठोर दर्शन होत जाते. ते वाचताना आजपर्यंतच्या प्रेमकवितेतील हुरहूर, आतुरता, मीलनाची धुंदी, दिव्य बेहोषी, तिच्यातील मांगल्य सारे विसरावयास होते.

मर्ढेकरांनी तशा प्रेमातील दिव्यत्व व्यक्त करणाऱ्या काही कविता लिहिल्या आहेत, पण त्यांची कविता प्रेमाचे दर्शन घडविते ते प्रामुख्याने उग्र आणि बकाल रूपातच. रात्रीचा पाश कोणाला सुटत नाही. मर्ढेकर तो सांगून जातात, पण हे सांगताना " मेल्या इच्छा सावकाश " हे सांगावयास विसरत नाहीत. पिस्टनरिंगच्या उदाहरणाने आजच्या विदारक मैथुनाचे स्वरूप ते स्पष्ट करतात -

" चकाकणारे अबलख पिस्टन
हिसके घेती मारित मिटक्या,
तशिवाचुन संभोगाची
अशीच कसरत असते हलक्या. "

आजपर्यंत मराठी कवींनी सर्वांगसुंदर अशा नायिकांचे रसिकांना दर्शन घडविले. मर्ढेकरांच्या कवितेत आढळणारी स्त्री अशी अप्सरास्मातील नाही. आजचे बकाल वास्तव आपल्या भोवती लपेटूनच त्यांची स्त्री आपल्यासमोर येते -----

" अशीच होती नकटी एक,
उलटे केस नि तिरप्या भिवया,
मुरकत दावी उरोज उन्नत
ठेपा जैसा तेल्याघरच्या. "

स्त्रीसंबंधीची स्वर्गीय कल्पना आणि प्रत्यक्ष वस्तुस्थिती यांतील भेसूर तफावत मर्ढेकर अशी आपल्या पुढे ठेवतात.

प्रेमवृत्तीच्या बाबतीत अनिलांची प्रतिक्रिया मर्ढेकरांच्या नेमकी उलट आहे. मर्ढेकर प्रेमातील बकालता आणि भग्नता दर्शवितात, तर अनिल दोन हृदयांच्या पवित्र समरसतेची प्रेमकल्पना व्यक्त करतात. प्रेमिकांना एकमेकांविषयी वाटणाऱ्या आपुलकीचे चित्रण अनिलांच्या कवितेत येते. " सखी माझे साधे सुमनचि त्वरे घेईल करी " असा विश्वास त्यांच्या प्रेमिकाला वाटत असतो. अनिलांच्या प्रेमकवितेत परिचयोत्तर प्रेमाची ओढ, सहवासाने निर्माण झालेले प्रेमाचे माधुर्य आणि प्रियेच्या कायमच्या वियोगामुळे प्रियकराच्या मनाची झालेली करुणावस्था यांची उत्कटत्से व्यक्त झाली आहेत. प्रियेचा चिरविरह झाल्याने येणाऱ्या एकाकीपणाचे अनिल असे चित्र रेखाटतात ---

" भिजल्या आहेत पाऊलवाटा आता साऱ्या तुझ्यामाझ्यामधल्या
मिटल्या आहेत जळावरल्या पुसट प्रकाशलाटा शेवटल्या

आधारच तुझ्या पायाखालचा निघून गेला कसा एकाएकी
ज्यावर आहे मी अजून चालत तुझ्यावाचून वाट एकाकी "

अनिलांनी प्रेमिकांच्या मनोमीलनाची सुरेख चित्रे रेखाटली आहेत. हे प्रेमिक परस्परांच्या सुखदु:खात सहभागी असतात, परन्तु ही सुखदु:खे केवळ त्यांच्यापुरतीच मर्यादित नसतात. ती समाजाच्या सुखदु:खाशी जखडलेली असतात. प्रेमिकांची सुखदु:खे अनिल समाजाच्या सुखदु:खाशी नेऊन जोडतात. हा प्रेमसंकल्पनेचा विकासच मानला पाहिजे.

" प्रीत तुझी माझी नाही निराळेपणाची
जगातल्या सुखदु:खी मिळालेपणाची "

एकूण मराठी प्रेमकवितेचा विचार करताना अनिलांची ही प्रेमसंकल्पना तिच्यात निश्चितपणे एक वेगळीक आणते.

कवयित्रींचा प्रेमाविष्कार

प्रेम हे जरी एकरूप असले तरी व्यक्तिपरत्वे आणि प्रसंगपरत्वे त्यात विविध छटा निर्माण होतात. कवीची प्रेमवृत्ती आणि कवयित्रीची प्रेमवृत्ती यांच्या आविष्कारात त्यामुळेच थोडेफार वेगळेपण आढळणार. मराठी कवयित्रींमध्ये उठून दिसणारे असे वेगळेपण आढळते ते इंदिरा संतांच्या कवितेत. इंदिरा संतांची कविता प्रेमातील दु:खाची आणि वेदनेची बाजू आपणांपुढे उलगडते. विरहवेदनेच्या अनेक छटा उलगडून दाखविणारी ही कविता आपल्या हृदयाला स्पर्श करून जाते.

प्रेमळ पतीच्या निधनाने इंदिराबाईंच्या संसाराचा रम्य डाव अचानक उधळून गेला आणि चिरविरह त्यांना आरपार लपेटून बसला. त्यांना सोबत राहिली ती या चिरविरहाचीच. इंदिराबाईंची कविता याच विरहाग्नीच्या ज्वालेचे धगधगते रूप घेऊन साकार झालेली आहे. पतिविरह हा आपल्या जीवनाला मिळालेला मोठा शाप आहे अशी कवयित्रीची मनोमय श्रध्दा बनलेली आहे. आता ती जगते आहे ते पतीच्या आठवणींवर. कवयित्रीचे पतीच्या आता अभावरूप बनलेल्या व्यक्तिमत्त्वाशी अतूट असे भावनिक नाते निर्माण होते आणि या कल्पनेतच ती विरून जाते. इंदिराबाईंच्या कविता म्हणजे स्मृतिरूप अनुभव आहेत. डॉ.सौ.मीना जोशी त्यांच्या काव्यात " स्मृतिरूप अनुभवांचा आवर्त " असल्याचे सांगतात ते खरे आहे.[१] हे स्मृतिरूप अनुभव असल्यामुळे त्यात शारीर आकर्षणाचा प्रश्नच उत्पन्न होत नाही. उरते ती जिवाला जाळणारी तगमग. विरहाच्या आणि विरहजन्य तगमगीच्या रेषांनी इंदिराबाईंच्या कविता मूर्त झालेल्या आहेत. मराठी कवितेत प्रेमातील गडद वेदनांचे वळण इंदिराबाईंच्या कवितेतच उमटलेले आहे. त्यांच्या कवितेने मराठी प्रेमकवितेला त्यामुळेच एक वेगळे परिमाण दिलेले दिसते.

संजीवनी मराठे, पद्मा गोळे, शान्ता शेळके या कवियत्रींनीही आपल्या कवितेत स्त्रीस्वभावसुलभ प्रेमभावना उत्कटतेने व्यक्त केली आहे. या मराठी कवयित्रींच्या आविष्कारात एक प्रकारचा धीटपणा आणि

---

१. डॉ.सौ.जोशी मीना, 'निरीक्षा,' सुपर्ण प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती १९७८, पृष्ठ वीस.

मोकळेपणा आढळतो. स्त्रीच्या प्रेमविषयक भावना त्यांच्या कवितेत लक्षणीय रीतीने व्यक्त झाल्या आहेत. याबाबतीत इंदिरा संतांच्या कवितेने आपले खास वेगळेपण दाखविले आहे.

## दलित प्रेमकविता

१९६० नंतर मराठी साहित्यात दलित साहित्याचे साद-पडसाद उमटू लागले. दलित लेखक स्वत:च्या बोलीभाषेत स्वत:चे अनुभव मांडू लागले. दलित कवींनी आपली वेदना आणि विद्रोह आपल्या कवितेत जसा व्यक्त केला आहे तशीच आपली प्रेमभावनाही व्यक्त केली आहे. पण त्यांची ही प्रेमाभिव्यक्ती प्रस्थापित प्रेमाभिव्यक्तीसारखी नाही. आपल्या भीषण, जर्जर आणि बकाल जीवनाची साथ - सोबत घेत ही प्रेमकविता साकार झालेली आहे. सुखवस्तू प्रेमाहून तिचे स्वरूप भिन्न आहे. शरणकुमार लिंबाळे यांनी दलित प्रेमकवितेची तीन अंगे सांगितली आहेत. ते लिहितात - " ती एक तर प्रेमकविता आहे. दुसरे ती सामाजिक विषमतेची प्रखर जाणीव असलेली आहे आणि तिसरे आपण प्रेयसी - प्रियकर असण्यापेक्षा कार्यकर्ते अधिक आहोत असा हा सूर आहे.[१] "

दलित प्रेमकवितेत केवळ प्रीतीचे नाजूक कोवळे सूर नसतात. ती धगधगते जीवन आणि रखरखीत वास्तव अधोरेखित करीत प्रकट होत असते. जीवनातील कुरूप, भयानक क्षण या कवितेत फुललेले

---

१. लिंबाळे शरणकुमार, संपादक " दलित प्रेमकविता " प्रथम आवृत्ती १९८६, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, पृष्ठ ६.

असतात. दलित कवीचे प्रेम प्राय: विद्रूप वास्तवाला वेटाळूनच प्रकट होताना दिसते. येथील प्रियकर बागेत किंवा हॉटेलात आपल्या प्रेयसीला भेटत नाही. त्यांची भेट झाली तर ती उकिरड्यावर किंवा भंगारवाल्याच्या दुकानात व्हायची. उत्तम बावसकर या भेटीबाबत सांगतात -

" तू अन् मी
उकिरडयावर भेटायचो
आपुन पुन्हा भेटायाचो
भंगारवाल्याच्या दुकानात[१] "

दलित प्रियकर आपल्या प्रियेसाठी शेवंतीची किंवा निशिगंधाची वेणी घेऊन येत नाही. त्याच्या आर्थिक स्थितीत ते शक्यही नाही. मुळात सारे जीवनच काटे वेचण्यात जावयाचे, तर प्रियेला सुगंधी फुले अर्पण करण्याची कल्पनाच त्याच्या मनात निर्माण होणे कसे शक्य आहे ? दिलीप सूर्यवंशी आपल्या प्रियेला सांगतात -

" प्रिये, आकाशातील चमकते चांदणे
तुझ्याकरिता मी तोडून आणेन
खुडलेल्या चांदण्याचा गजरा
तुझ्या रेशमी केसात सजविन
असे काही मी म्हणणार नाही
माझ्या मर्यादा मला माहीत आहेत
खोटया कल्पनांचा फुलोरा कशाला ?

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१. तत्रैव, पृष्ठ ११.

जीवनात ज्या उतरत नाहीत
हो! एवढे मात्र खरे
जीवनातील काटे वेचताना
अशाच एखाद्या उसंतवेळी
तुझ्या मोकळ्या केसात
निवडुंगाचे फूल तरी माळेन
तेव्हा मात्र असावीस तू
माझ्याजवळ त्यावेळी "[१]

दलित प्रियकर असे " काटे " वेचणारा आहे. जीवनाच्या ओझ्याखाली त्याला खळाळून हसताही येत नाही. " भेटलीस अशावेळी, जेव्हा सूर्यचक्राने कंबरेचे टाके ढिले केले होते " असा प्रियकर केशव मेश्रामांच्या कवितेत भेटतो. दलित प्रेमकविता ही मराठी कवितेतील अशी एक वेगळी अनुभूती आहे. जीवनातील ताण-तणाव, रखरखीत वास्तव यांना आपल्या समवेत घेऊन वावरणारी ही कविता आहे.

मराठी कवितेतील काही महत्वाची वळणे आपण आतापर्यंत पाहिली. तिच्या प्रत्येक वळणावर तिला एकेक नवे परिमाण प्राप्त झालेले आहे. आपले नवे नवे जीवनानुभव व्यक्त करीत ती विकसित होत राहिलेली आहे. प्रारंभी सांगितल्याप्रमाणे ती अलौकिक अनुभूतीकडून ऐहिक अनुभूतीकडे आपली वाटचाल करीत आली आहे. स्त्रीपुरुषसंबंधाकडे ती वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून पाहत आलेली आहे. या संबंधात स्त्री कधी भोग्या म्हणून, कधी पत्नी म्हणून, कधी प्रेयसी म्हणून, तर कधी

---

१. तत्रैव, पृष्ठ ७५.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

सखीच्या नात्याने चित्रित झालेली आहे. मराठी प्रेमकवितेच्या ऐहिक अनुभूतीतही केवढी वेगळीक आहे. कधी ती सुखासीन वातावरणात रूळताना दिसते, कधी यांत्रिक मरगळलेल्या स्थितीत ती वावरते, तर कधी बकाल, फाटक्या घरात ती फुलते. या कवितेतील प्रेम कधी पवित्र असते, तर कधी कामुक असते. कधी ते " प्लेटॉनिक लव्ह " चे रूप धारण करते, कधी निरपेक्ष अवस्थेत व्यक्त होते, तर कधी दीन-जर्जर स्थितीचा विसर पाडते. कधी तिच्याभोवती सुखावस्थेचे धवल वलय असते, तर कधी गडद काळ्या दु:खवेदनांचे मेघ तिला झाकाळून टाकतात. मराठी प्रेमकवितेत अशी विविधता आहे. अनेक छटांचे रंगीत रूप तिला प्राप्त झालेले आहे. स्त्रीपुरुषांमधील अवास्तव अंतर दूर करीत ती त्यांच्या रूपांचे, त्यांच्या वृत्तींचे, त्यांच्या हृदयभावांचे वैविध्य मांडीत आलेली आहे. प्रेमभावनेचे अनेक पापुद्रे उलगडणारी मराठी कविता साकल्याने आपली समृध्दी व्यक्त करते आहे.

गोविन्दाग्रज आणि भा.रा.तांबे यांच्या प्रेमकवितांचा तौलनिक अभ्यास हा माझ्या लघु-शोधप्रबंधाचा विषय आहे. प्रस्तुत दोन कवींच्या प्रेमकवितांचा विचार करताना मराठी कवितेने याबाबतीत जी वळणे घेतली त्यांचा स्थूल आढावा घेणे आवश्यक ठरते. कवी कितीही मोठा असला तरी त्याच्या काव्यावर पूर्वकवितेचा थोडाफार परिणाम होत असतोच. पूर्वकवितेचे काही संस्कार स्वीकारून प्रतिभावंत कवी आपली पृथगात्मता व्यक्त करीत असतो. या कवीचा पुन्हा पुढील परंपरेवर प्रभाव पडत असतो.

गोविन्दाग्रजांच्या बाबतीत बोलावयाचे तर त्यांच्या कवितेवर पूर्वसूरींच्या कवितेचा प्रभाव ठळकपणे उमटलेला दिसून येतो. पुन्हा पुढिलांनी गोविन्दाग्रजांचे मोठे अनुकरण केलेले दिसते. भा. रा. तांबे यांची प्रेमकविता स्वतंत्र वातावरणात फुलली, पण तिने बोरकरादी पुढील पिढीतील कवींवर आपला ठसा उमटविला आहे. त्यामुळेच मराठी प्रेमकवितेतील काही महत्वपूर्ण टप्प्यांचा हा आढावा घेणे मला आवश्यक वाटलेले आहे.

या आढाव्यामुळे वर्ण्य कवींचा पूर्वापरसंबंध लक्षात येण्याजोगा आहे. मराठी प्रेमकवितेने जी विविध वळणे घेतली त्यांच्याशी प्रस्तुत कवींचाही संबंध येणे शक्य आहे. या आढाव्यामुळे अशा संबंधाची पाहणी करता येईल. शिवाय एकूण मराठी प्रेमकवितेत या दोन कवींचे स्थान कोठे आहे यावर प्रकाश पडण्यासारखा आहे. या त्रिविध कारणांनी मी मराठी प्रेमकवितेतील ठळक वळणांची नोंद केली आहे.

=o=o=